Marathwada Shikshan Prasarak Mandal's

# Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon




**INTERNAL QUALITY ASSURANCE CELL**

**CRIETERION-6:** GOVERNANCE, LEADERSHIP AND MANAGEMENT

## 6.1 Institutional Vision and Leadership

**6.1.1 The governance and leadership is in accordance with vision and mission of the institution and it is visible in various institutional practices such as decentralization and participation in the institutional governance**

## Case Study- Report of Sunderrao Solanke Lecture Series

Marathwada Shikshan Prasarak Mandal's

# Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

# Sunderrao Solanke Lecture Series

## INDEX

| Sr. No. | Particulars |
|---|---|
| 1 | Annual Report of Sunderrao Solanke Lecture Series- 2021-2022 |
| 2 | Annual Report of Sunderrao Solanke Lecture Series- 2022-2023 |
| 3 | Photo Gallery of Sunderrao Solanke Lecture Series |
| 4 | Newspaper cutting of Sunderrao Solanke Lecture Series |

Date: 17-19 Sept. 2021
Title: Report of lecture series
Report: On the ocassion of birth anniversary of Hon. Sunderraoji Solnake, Lecture series organized by department of Marathi wherein there was recap of contribution of Late. Sunderraoji Solanke in the field of education and socio-economic development

Sunderrao Solanke Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed (Maharashtra) Majalgaon

म.शि.प्र.मंडळाचे,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव

## व्याख्यानमाला अहवाल

## 2021- 2022

कै. सुंदरराव सोळंके साहेबांची जयंती आणि महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष यानिमित्ताने मराठी विभागाकडून तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

दि. १७ सप्टेंबर २०२१ रोजी सुंदरराव सोळंके साहेबांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी "आठवणीतले साहेब" या विषयावर व्याख्यान देण्यासाठी मा. आ. राजेंद्र जगताप आणि मा. आ. मोहनरावजी सोळंके यांना आमंत्रित करण्यात आले.तसेच या कार्यक्रमाला मा.आ.भाई जनार्धन तुपे,मा.आ.प्रकाशदादा सोळंके यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आ. डी. के. देशमुख उपस्थित होते. मा. आ. राजेंद्र जगताप यांनी राजकारणातील नीतिमूल्ये व सुंदरराव सोळंके यांचे राजकारण या विषयावर व्याख्यानातून प्रकाश टाकला तर मा. आ. मोहनराव सोळंके यांनी सुंदरराव सोळंके साहेब यांच्या राजकारणातील प्रवास अधोरेखित केला. अध्यक्षीय भाषणामध्ये मा. डी के देशमुख यांनी राजकारणातील चारित्र्य आणि साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला.
कार्यक्रमाचा प्रारंभ सुंदरराव सोळंके साहेबांच्या प्रतिमा पूजनाने झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयसिंगभैया सोळंके यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.बबन उदावंत यांनी तर आभार प्राचार्य डॉ.गोवर्धन सानप यांनी मानले.

दि.१८ सप्टेंबर २०२१ रोजी सुंदरराव सोळंके यांच्या खाजगी जीवनाला उजाळा देण्यासाठी "आम्ही पाहिलेले साहेब" हा विषय ठेवण्यात आला. या विषयावर मा. सौ. मंगलताई सोळंके आणि मा. धैर्यशील सोळंके यांना व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.आ. प्रकाशदादा सोळंके यांनी भूषविले. या कार्यक्रमात मंगलताई सोळंके यांनी साहेबांच्या नम्र व तत्वनिष्ठ आचरणावर प्रकाश टाकला तर मा. धैर्यशील सोळंके यांनी साहेबांच्या वात्सल्ययुक्त प्रेमळ स्वभाव आणि आदबशीरपणा अधोरेखित केला. अध्यक्षीय समारोपात मा. प्रकाशदादा यांनी साहेबांच्या सहकारी साखर कारखान्याची स्थापना आणि माजलगाव धरण उभारणीतील योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले.यावेळी दयानंद स्वामी यांचेही समयोचित भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पल्लवीताई सोळंके यांनी केले तर आभार प्रा.नंदकुमार मुळे यांनी मानले.

दि. १९ सप्टेंबर २०२१ रोजी सुंदरराव सोळंके साहेब यांच्या कार्य-कर्तृत्वावर प्रकाश पडावा यादृष्टीने "साहेबांचे जीवनकार्य" असा विषय ठेवण्यात आला. या विषयावर व्याख्यान देण्यासाठी मा. जयसिंगभैय्या सोळंके यांना निमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. आ. राधाकृष्ण होके पाटील यांनी भुषविले. या कार्यक्रमात जयसिंगभैय्या सोळंके यांनी साहेबांच्या राजकीय कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोपात होके पाटील यांनी सुंदरराव सोळंके साहेबांच्या स्थानीय राजकारण ते राज्य पातळीवरील राजकारण याचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे प्रस्थाविक प्राचार्य डॉ.गोवर्धन सानप यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.एम.ए.कव्हळे यांनी तर आभार डॉ.भाऊसाहेब यांनी मानले.



सुवर्ण महोत्सवी वर्ष

सन २०२१-२२

सुंदरराव सोळंके महाविद्यालय,माजलगाव

स्व.सुंदरराव सोळंके साहेबांच्या

जयंती निमित्त

" साहेबांच्या आठवणी "

स्थळ : वैष्णवी मंगल कार्यालय,माजलगाव

श्री./सौ.

प्राचार्य, डॉ.गोवर्धन सानप

" साहेबांच्या आठवणी "

• अध्यक्ष •

मा.आ.डी.के.देशमुख

मा.आ.मोहनरावकाका सोळंके

मा.आ.राधाकृष्णआण्णा होके पाटील

' आम्ही पाहिलेले साहेब '

• अध्यक्ष •

आमदार प्रकाशदादा सोळंके

• अनुपम उपस्थिती •

• विनीत •

व्याख्यानमाला 2021- 2022 कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका





व्याख्यानमालेत बोलताना मा. प्रकाशदादा सोळंके, व्यासपीठावर मा. धर्यशील सोळंके, मा. मंगलाताई सोळंके, मा. पल्लवीताई सोळंके ई.

# आठवणींतून माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या कार्याला उजाळा
## सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन




दै. तरुण भारत दि. १८/०९/२०२१

कार्यारंभ

Friday 2021/09/17

# सुंदराराव सोळंके यांच्या जयंतीदिनी दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी । माजलगाव

दि.१६ : सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आणि सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त दि. १७ व १८ सप्टेंबर रोजी 'साहेबांच्या आठवणी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालय सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करत असून याअनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंती निमित्त 'साहेबांच्या आठवणी' अंतर्गत दोनदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन वैष्णवी मंगल कार्यालयात करण्यात आले आहे. दिनांक १७ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात कै सुंदराराव सोळंके यांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार आदी कार्याच्या आठवणींना उजाळा देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आ.डि.के.देशमुख हे राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.आ.मोहनराव सोळंके, माजी आ.राधाकृष्ण होके पाटील, माजी आ. राजेंद्र जगताप, आमदार प्रकाशराव सोळंके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे तर दि.१८ सप्टेंबर रोजी 'आम्ही पाहिलेले साहेब' या अंतर्गत सुंदरराव सोळंके यांच्या कौटुंबिक आठवणींना उजाळा देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रकाशराव सोळंके हे राहणार आहेत तर अनुभव कथन करण्यासाठी धैर्यशील सोळंके, मंगलाताई सोळंके, जयसिंग सोळंके, उज्वला धैर्यशील सोळंके, ऐश्वर्या जयसिंग सोळंके, वीरेंद्र प्रकाश सोळंके, पल्लवीताई वीरेंद्र सोळंके उपस्थित राहणार आहेत तर भानुदासराव डक, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बळीराम चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

स्व.सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या साहेबांच्या आठवणी, या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ.गोवर्धन सानप, उपप्राचार्य नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे, प्रा.भाऊसाहेब राठोड, प्रा.गणेश सोळंके, प्रशांत चव्हाण, प्रा बालाजी बोडके, प्रा.प्रदीप सोळंके यांनी केले आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालय
मराठी विभाग
माजलगाव

मराठी विभागप्रमुख
सुंदरराव सोळंके महाविद्यालय,माजलगाव जि.बीड

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय

माजलगाव जि.बीड

# सुंदरराव सोळंके व्याख्यानमाला

श्रीमान / श्रीमती ____________________

**पुष्प पहिले**

दि.१५ सप्टेंबर २०२२ सकाळी १०.३० वा.

अध्यक्ष : मा.ॲड.भानुदासराव डक (सदस्य, महाविद्यालय विकास समिती)

उद्घाटक व व्याख्याते : मा.डॉ.सतीश साळुंके (प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत)

विषय : शिव–फुले–शाहू–आंबेडकरांचा महाराष्ट्र राहिलाय का ?

**पुष्प दुसरे**

दि.१६ सप्टेंबर २०२२ सकाळी १०.३० वा.

अध्यक्ष : मा.सत्यप्रकाशजी रूद्रवार (सदस्य, महाविद्यालय विकास समिती)

व्याख्याते : मा.अमर हबीब (सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत)

विषय : आता उठवू सारे रान...!

**पुष्प तिसरे**

दि.१७ सप्टेंबर २०२२ सकाळी ०९.०० वा.

अध्यक्ष : मा.आ.प्रकाशदादा सोळंके (अध्यक्ष, म.शि.प्र.मं.औरंगाबाद)

व्याख्याते : मा.डी.के.देशमुख (माजी शिक्षक आमदार)

विषय : सुंदरराव सोळंके साहेब यांचे जीवनकार्य

आपण कार्यक्रमास उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**विनीत**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड<br>मराठी विभागप्रमुख | डॉ.एम.ए.कव्हळे<br>उपप्राचार्य | डॉ.एन.के.मुळे<br>उपप्राचार्य | प्रा.डॉ.जी.के.सानप<br>प्राचार्य |
| प्रा.पवनकुमार शिंदे<br>उपप्राचार्य (क.म.) | प्रा.प्रकाश गवते<br>उपप्राचार्य (क.म.) | प्रा.बी.बी.वऱ्हाडे<br>मराठी विभाग | प्रा.एस.एस.मुळाटे<br>मराठी विभाग |

स्थळ : सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि.बीड

व्याख्यानमाला 2022- 2023 कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका




व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना इतिहास तज्ज्ञ डा. सतीश साळुंके

Date: 15-17 Sept. 2022
Title: Report of lecture series
Report: on the ocassion of birth anniversary of Hon. Sunderraoji Solnake, Lecture series organized by department of Marathi wherein there was recap of contribution of Late. Sunderraoji Solanke in the field of education and socio-economic development

म.शि.प्र.मंडळाचे,

सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव

**व्याख्यानमाला अहवाल**

**2022-23**

सुंदरराव सोळंके साहेबांच्या जयंतीच्या निमित्ताने दि. 15, 16, 17 सप्टेंबर 2022 रोजी तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

दि 15 सप्टेंबर 2022 रोजी "शिव फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र राहिलाय काय?" या विषयावर इतिहास तज्ज्ञ डॉ. सतीश साळुंके यांना व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. गोवर्धन सानप यांनी भूषविले. प्रथमतः कार्यक्रमाचे उद्घाटक व व्याख्याते सतीश साळुंके यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात बोलताना सतीश साळुंके यांनी धर्माच्या नावावर खोटा राष्ट्रवाद निर्माण करणे देशासाठी घातक असल्याचे मत व्यक्त केले. थोर महापुरुषांचे विचार फोटो पुरते मर्यादित न ठेवता ते वाचनातून आत्मसात करावेत असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य सानप यांनी दिवंगत सुंदरराव सोळंके यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संजय राठोड यांनी तर आभार डॉ. एम. ए. कव्हळे यांनी मानले.

दि. 16 सप्टेंबर 2022 रोजी "आता उठवू सारे रान....!" या विषयावर सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत मा. अमर हबीब यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ गोवर्धन सानप यांनी भूषविले. या कार्यक्रमांमध्ये अमर हबीब यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या हालाखीच्या परिस्थितीला राज्यकर्ते तसेच जागतिकीकरण जबाबदार असल्याचे मत व्यक्त केले. प्राचार्य सानप यांनी अध्यक्षीय समारोप करताना समयोचित विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बापूराव वऱ्हाडे यांनी तर आभार डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी मानले.

दि. 17 सप्टेंबर 2022 रोजी व्याख्यानासाठी मा. आ. डी. के. देशमुख यांना "सुंदरराव सोळंके साहेब यांचे जीवनकार्य" असा विषय देण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. आ. प्रकाशदादा सोळंके यांनी भुषविले. या कार्यक्रमात मा. डी. के देशमुख यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाची पायाभरणी सुंदरराव सोळंके यांनी केल्याचे मत मांडले. मा. प्रकाशदादांनी महाविद्यालय व म. शि. प्र. मंडळाच्या चढत्या विकासाभिमुख आलेखावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम. ए. कव्हळे यांनी तर आभार प्राचार्य गोवर्धन सानप यांनी मानले.




व्याख्यानमालेत बोलताना सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत मा. अमर हबीब

सकाळ



माजलगाव : सोळंके महाविद्यालयात गुरुवारी आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. सतीश साळुंके.

# सोळंके महाविद्यालयात व्याख्यानमाला

**माजलगाव, ता.१५ (बातमीदार) :** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सोळंके महाविद्यालयात ता. १५ ते १७ सप्टेंबर दरम्यान तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवारी (ता. १५) सतीश साळुंके यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. के. सानप होते. उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य कव्हळे, प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, पर्यवेक्षक महादेव अलझेंडे यांची उपस्थिती होती. डॉ. सतीश साळुंके म्हणाले, शिवाजी महाराज यांचे हिंदुत्व इतर धर्मियांच्या द्वेषावर आधारीत नव्हते. तर ते सहिष्णुतावादी होते. त्यांनी इतर धर्मीयांचा आदर करून सर्वांना सोबत घेऊन स्वराज्य निर्माण केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य सानप यांनी दिवंगत सुंदरराव सोळंके यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संजय राठोड यांनी केले.

Aurangabad, Beed-Today
16/09/2022 Page No. 4

# पार्श्वभूमी

दिनांक १६ सप्टेंबर २०२२ शुक्रवार — गंमत भंडारी — ई-पेपर www.parshvbhumi.com — Reg.No.L 65 RNP Beed 2020-22 RNI

# धर्माच्या नावावर खोटा राष्ट्रवाद निर्माण करणे देशासाठी घातक

## सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेत डॉ सतीश साळुंके यांचे प्रतिपादन



PRINCIPAL
Sunderrao Solanke Mahavidyalya
Majalgaon Dist. Beed (M.S.)

सुंदरराव सोळंके महाविद्यालय मराठी विभाग माजलगाव

Sunderrao Solanke Mahavidyalaya MAJALGAON DIST.BEED (MAHARASHTRA) Majalgaon

मराठी विभागप्रमुख
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि.बीड

Coordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC)
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon, Dist.Beed (MS)